# राज्य माहिती आयोग नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नल जवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३)अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.८५०/२०२०/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ पवार रा.दहिवड, ता.देवळा, जि.नाशिक | विस्तार अधिकारी (बिट उमराणा) पंचायत समिती, देवळा, ता.देवळा, जि.नाशिक | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, देवळा, जि.नाशिकं |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक -२७/१०/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनाक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०६/११/२०१९ | ०६/११/२०१९ | १४/११/२०१९ | १७/१२/२०१९ | १७/१२/२०१९ | --- |

१. अपिलार्थी यांनी दि. २४/०२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये " माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती संदर्भात कुठलीही कार्यवाही झालेली नाही" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असुन अन्य सर्व पक्षकार उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मी दि.२४/०९/२०१९ रोजी आपल्या कार्यालयाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत फि न भरल्यामुळे पाल्याला होणाऱ्या मानसिक व शारिरिक त्रासाबद्दलचा अर्ज दिलेला होता. अर्जाच्या चौकशीकामी आपल्या विभागातला शिक्षण विस्ता अधिकारी यांनी दि.०९/१०/२०१९ रोजी मेशी ता.देवळा (नाशिक) येथील इंग्रजी माध्यमाच्या नवनाथ इंग्लिश मेडिअम स्कुलवर मला बोलावणे करुन सदर बाबत चौकशी करुन कोणत्या तसेच कशाप्रकारे कार्यवाही केलेली आहे. बाबतचे आकलन मला झालेले नाही. तरी सदर विषयी संबंधित शाळेवर कशाप्रकारे कार्यवाही आपल्या विभागामार्फत झालेली आहे. याबाबतचा अहवाल माहितीस्तव मला मिळावा"

४. सदर माहिती अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, देवळा यानी दि. १४/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कलम ६(३) अन्वये विस्तार अधिकारी (बिट उमराणा) पंचायत समिती, देवळा यांच्याकडे हस्तांतरीत केलेला आहे असे दिसुन येते.

५. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" मध्ये "आजपावेतो माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(३) अन्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, देवळा यांनी कोणतीही सुनावणी घेऊन कार्यवाही केलेली नसुन कोणताच आदेश पारित केलेला नाही.

६. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान अपिलार्थीने दि.२७/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, माहिती मला समक्ष मिळाली असुन सदर माहिती विषयी समाधान झाले असुन माझी कुठलीही तक्रार नाही असे लेखी निवेदन सादर केलेले आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्र. ८५०/२०२०/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ओ-१९८९ 22 JUL 2024